## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०१.०२.२०१७<br>०१.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

याव्दारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ३१.०१.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे बिडकीन:—** गुरन । ३१/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे अशोक हरी जाधव वय २५ वर्ष व्यवसाय मजुरी रा. जांबेवाडी ता. पैठण यांनी फिर्याद दिली की यातील फिर्यादीने त्याची स्प्लेंडर कंपनीची मो.सा. कं. एमएच २० ईएच ०७४६ काळया रंगाची ही जांबेवाडी शिवारात शेत गट नं. ६५ येथे उभी करून गव्हाचे पिकास पाणी देत असताना कोणीतरी अज्ञात आरोपीने लबाडीचे इरादयाने चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९९७ लोणे पोस्टे बिडकीन हे करीत आहे.

**आकस्मात मृत्यु:—**

**०१) पोस्टे पिशोर:—** आ.मृ. नंबर ०५/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार वैद्यकीय अधिकारी श्रीमती शारदा वामन खरात ग्रामिण रूग्णालय पिशोर यांनी खबर दिली की यातील मयत नामे सुधाकर रंगनाथ सोनवणे वय ३० वर्ष रा. निंभोरा ता. कन्नड याने काहीतरी विषारी औषध सेवन केल्याने त्यास मृत अवस्थेत ग्रामिण रूग्णालय पिशोर येथे आणुन दाखल केले म्हणुन आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ गरड पोस्टे पिशोर हे करीत आहे.

**०२) पोस्टे गंगापुर:–** आ.मृ. नंबर ०८/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/२७३ एस.एम. तडवी नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे मुकुंद शंकर सुरडकर वय ५० वर्ष रा. कन्नड ह.मु. वैजापुर याचा दिनांक ३१.०१.२०१७ रोजी १५.४५वा. सुमारास साबने टॉकीज जवळ गंगापुर येथे रोडवर मोटार अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्यास प्रथमोपचार कामी उपजिल्हा रूग्णालय गंगापुर येथे आणुन अधिक उपचार कामी घाटी रूग्णालय औरंगाबाद येथे दाखल केले असता सिएमओ यांनी तपासुन मयत घोषीत केले वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/१०८३ गोडे पोस्टे गंगापुर हे करीत आहे.

**०३) पोस्टे करमाड:–** आ.मृ. नंबर ०४/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/२७३ एस.एम. तडवी नेमणुक घाटी मेडीकल चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे गंगुबाई लक्ष्मण घुनावत वय २८ वर्ष रा. पांढरी पिंपळगाव ता.जि. औरंगाबाद हि दिनांक २४.०१.२०१७ रोजी सकाळी ०७.००वा. स्वत:चे घरी जळाल्याने घाटी दवाखाना औरंगाबाद वार्ड क्रं. २२/२३ मध्ये उपचार सुरू असताना दिनांक ३१.०१.२०१७ रोजी १९.१५वा. मरण पावली आहे वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. पवार पोउपनि पोस्टे करमाड हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०७ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०७ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ३८५५/–रू. किं. १८० मिलीच्या ७१ देशी दारूच्या बाटल्या व १० ली. गावठी हातभट्टीची दारू चा माल जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदयाप्रमाणे केलेली कार्यवाही:–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०१ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०१ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ६०१५/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री पोउपनि कुलकर्णी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण